# उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई यांचे कार्यालय

३०३, अे विंग, ३ रा मजला, बी.एम.सी.गोडाऊन इमारत, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, ठाकूर कॉम्प्लेक्स,
९० फुट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अे) अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/उपनि/ आर दक्षिण / २९८५ /२०१७.
दिनांक - ७/१२/२०१७.

**१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतूद.**
**२. श्री महेश चतुर्वेदी यांचेकडील दिनांक २४.०८.२०१७ रोजीचे तक्रार अर्ज.**
**३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) दिनांक ०४.०९.२०१७ रोजीची नोटीस.**
**४. या कार्यालयाकडील दिनांक ०१.०९.२०१७, १३.१०.२०१७, १६.१०.२०१७ व ०१.११.२०१७ रोजीचे पत्र**

ज्याअर्थी विष्णू शिवम टॉवर को.ऑप.हौ.सो.लि., सीटीएस नं. ७९२/ ए, ७९२/२, ८०९ ए / १/१/१ & ८०९/ए/१/१/५ (पार्ट) ऑफ व्हिलेज पोईसर, कांदीवली ( पूर्व) मुंबई - १०१ संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यांत आलेली असून तिचा नोंदणी क्र. एमयुएम / डब्ल्युआरएस/एचएसजी/टीसी १५५६८ दिनांक २४.०२.२०१६ असा आहे. आणि,

ज्याअर्थी विष्णू शिवम टॉवर को.ऑप.हौ.सो.लि., सीटीएस नं. ७९२/ ए, ७९२/२, ८०९ ए / १/१/१ & ८०९/ए/१/१/५ (पार्ट) ऑफ व्हिलेज पोईसर, कांदीवली ( पूर्व) मुंबई - १०१ (यापुढे संस्था असे वाचावे) या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे), व संस्थेच्या नोंदणीकृत उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतूदीस अनुसरुन कामकाज करणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील संस्था बृहन्मुंबईच्या आर दक्षिण विभागात कार्यरत असल्याने त्या संस्थेचे निबंधक, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई हे आहेत आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (कब) (१) नुसार सहकारी संस्थेच्या सर्व निवडणूका घेणेसाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारण यांची निर्मीती करणेत आलेली आहे. कलम ७३ कब (१४) नुसार प्रत्येक सहकारी संस्थेने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात, तिची मुदत संपण्यांच्या किमान सहा महिन्यापूर्वी आपला पदावधी संपण्यांबाबत कळविण्यांची तरततुद आहे तसेच समितीच्या किंवा तिच्या पदाधिका-यामध्ये निर्माण झालेल्या कोणत्याही रिक्त पदाबाबत असे रिक्त पद निर्माण झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आंत कळविणेतची तरतुद आहे आणि,

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(१) नुसार अधिनियम,नियम आणि उपविधी यानुसार प्रस्थापित केलेल्या समितीमध्ये प्रत्येक संस्थेचे व्यवस्थापन निहित असेल व त्या समितीने, हा नियम, अधिनियम आणि उपविधी याअन्वये अनुक्रमे देण्यांत येतील अशा अधिकाराचा वापर केला पाहिजे आणि अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (१) नुसार समितीची मुदत संपण्यापूर्वी कलम ७३ कब (१४) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे, समितीची निवडणूक घेणेसाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविणे हे समितीचे कर्तव्य आहे आणि,

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (१) नुसार अधिनियम,नियम आणि उपविधी यानुसार प्रस्थापित केलेल्या समितीमध्ये प्रत्येक संस्थेचे व्यवस्थापन निहित असेल व त्या समितीने, हा नियम, अधिनियम आणि उपविधी याअन्वये अनुक्रमे देण्यांत येतील , अशा अधिकाराचा वापर केला पाहिजे आणि अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (१) नुसार समितीची मुदत संपण्यापूर्वी कलम ७३ कब (१४) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे, समितीची निवडणूक घेणेसाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविणे हे समितीचे कर्तव्य आहे आणि,

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय (२) नुसार समितीने तिची निवडणूक घेण्यासंबंधात , राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविण्यांस बुध्दीपुरस्सर कसूर केली असेल, तर आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव, मुदत संपण्यापूर्वी समितीची निवडणूक घेता आली नसेल तर, समितीचे सदस्य

Scanned by CamScanner

त्यांचे अधिकारपद धारण करण्यांचे बंद करतील आणि अशा परिस्थितीत निबंधक अधिनियमाच्या कलम ७७ अ अन्वये कारवाई करणेची तरतुद आहे आणि

ज्याअर्थी, ज्याअर्थी, व्यवस्थापक समितीचा कालावधी दिनांक २३.०२.२०१७ समाप्त झालेला असतांनाही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (आय) मध्ये विनिर्दिष्ट करण्यांत आल्याप्रमाणे, व्यवस्थापक समितीची मुदत संपण्यापूर्वी समितीची रचना करण्यासाठी, निवडणूक घेण्याकरिता आवश्यक व्यवस्था करण्यास कसुर केलेली आहे आणि

ज्याअर्थी, व्यवस्थापक समिती, संस्थेतील सदस्याच्या हितास बाधक होईल अशी कृती करीत असल्यामुळे तसेच मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाने सहकार अधिनियमाच्या तरतुदी अन्वये विहित मुदतीमध्ये निवडणूक घेणेस कसुर केलेली आहे आणि,

ज्याअर्थी, ज्यावेळेस समितीची मुदत वाढविली नसेल किंवा वाढविल्यानंतर सुध्दा निवडणूक घेतली नसेल त्यामुळे नवीन समिती नेमली गेली नसेल अशावेळेस निवधकाने प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणेसाठी योग्य ती पावले उचलावयास पाहिजेत. समितीचा कालावधी ज्याक्षणी संपतो, त्यावेळेस व्यवस्थापन समितीचा कालावधी समाप्त होतो, त्यामुळे अशा समितीला पुढील काळासाठी काम करण्यांचा अधिकार प्राप्त होत नाही. याच कारणासाठी समितीचे म्हणणे ऐकूण घेण्यांची जरुरी नाही अशी तरतुद आहे आणि,

ज्याअर्थी, वर नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नाही ही वस्तुस्थिती निदर्शनास येत आहे. सबब संस्थेच्या व्यवस्थापक समितीने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ आय मधील तरतुदीचे उल्लंघन केल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे ७७(अ) मधील तरतुदीनुसार संचालक मंडळ बरखास्त करुन प्राधिकृत अधिकारी यांची का नियुक्ती करणेत येऊ नये ? याबाबतचा लेखी खुलासा व तोंडी म्हणणे मांडण्यासाठी संदर्भ क्र ३ अन्वये नोटीस निर्गमित करण्यात आलेली होती.आणि,

ज्याअर्थी, संदर्भ क्र.३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने या कार्यालयात दिनांक २६.०९.२०१७ रोजी सुनावणी घेण्यात आलेली असून सदर सुनावणीस संस्थेतर्फे डॉ. संदीप देशपांडे चेअरमन, व मॅनेजर हे उपस्थित असून नस्ती निर्णयार्थ बंद करण्यात आले. आणि,

**संस्थेचे चेअरमन** डॉ. संदीप देशपांडे व मॅनेजर **यांनी उपस्थित राहून खालील प्रमाणे म्हणणे सादर केले.**

१) संस्थेची नोंदणी दिनांक २४.०२.२०१६ रोजी झालेली असून संस्थेच्या हंगामी व्यवस्थापक समितीची मुदत समाप्त झाल्यामुळे निवडणूकी संदर्भातील कागदपत्रे सादर करणेबाबत मुदत देणेबाबत तोंडी विनंती केली.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. ३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने संस्थेच्या हंगामी व्यवस्थापक समितीचा कालावधी दिनांक २३.०२.२०१७ रोजी समाप्त झालेला असतानाही निवडणूकीसाठी आवश्यक असलेली माहिती निबंधक कार्यालयास तसेच मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांना सादर करण्यास वारंवार संधी देऊन तसेच लेखी पत्राने अवगत करुन सुध्दा अद्याप पर्यंत निवडणूकी संदर्भात कोणतेही कागदपत्रे जाणीव पुर्वक, हेतुपुरस्पर सादर केलेली नाही. मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाने सहकार अधिनियमाच्या तरतुदी अन्वये विहित मुदतीमध्ये निवडणूक घेणेस कसुर केलेली आहे. समितीची मुदत वाढविली नसेल किंवा वाढविल्यानंतर सुध्दा निवडणूक घेतली नसेल त्यामुळे नवीन समिती नेमली गेली नसेल अशावेळेस निबंधकाने प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणेसाठी योग्य ती पावले उचलावयास पाहिजेत. समितीचा कालावधी ज्याक्षणी संपतो, त्यावेळेस व्यवस्थापन समितीचा कालावधी समाप्त होतो, त्यामुळे अशा समितीला पुढील काळासाठी काम करण्यांचा अधिकार प्राप्त होत नाही. आणि,

त्याअर्थी वर नमुद परिस्थती विचारात घेता संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नाही ही वस्तुस्थिती निदर्शनास येत असल्यामुळे संस्थेचे दैनदिन कामकाज चालविण्यासाठी व संस्थेवर त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली असल्यामुळे, मी खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

उपनिबंधक, सहकारी संस्था आर (दक्षिण) विभाग यांचे कार्यालय OFFICE OF DEPUTY REGISTRAR C.S.R. WARD MUMBAI

## आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१)(बी) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी डॉ. अविनाश भागवत, उपनिबंधक, सहकारी संस्था,आर/दक्षिण विभाग, मुंबई याद्वारे विष्णू शिवम

Scanned by CamScanner

टॉवर को.ऑप.हौ.सो.लि., सीटीएस नं. ७९२/ ए, ७९२/२, ८०९ ए / १/१/१ & ८०९/ए/१/१/५ (पार्ट) ऑफ व्हिलेज पोईसर, कांदीवली ( पूर्व) मुंबई - १०१ या संस्थेच्या विदयमान व्यवस्थापक समिती निष्प्रभावीत करीत असून संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणेसाठी श्रीमती नजमा पटेल, प्रमाणित लेखापरीक्षक याची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक ०/१२/२०१७ रोजी माझी सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह दिला असे.

(डॉ.अविनाश भागवत),
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

प्रत,
श्रीमती नजमा पटेल, प्रमाणित लेखापरीक्षक,
चंद्रकीरण बिल्डीग बी/३०४, आबोली पेट्रोल पंप समोर,
केवनीपाडा, एस व्ही रोड समोर,योगेश्वरी (पश्चिम) मुंबई-१०२
यांना कळविण्यात येते की, संस्थेच्या माजी पदाधिकारी यांचेकडून दप्तराचा ताबा त्वरीत घेऊन तसा अहवाल या कार्यालयात अवगत करावा.

प्रति,
१) अध्यक्ष / सचिव,
विष्णू शिवम टॉवर को.ऑप.हौ.सो.लि.,
सीटीएस नं. ७९२/ ए, ७९२/२, ८०९ ए / १/१/१ &
८०९/ए/१/१/५ (पार्ट) ऑफ व्हिलेज पोईसर, कांदीवली ( पूर्व) मुंबई - १०१
२) डॉ.देशपांडे अध्यक्ष,
विष्णू शिवम टॉवर को.ऑप.हौ.सो.लि., सीटीएस नं. ७९२/ ए,
७९२/२, ८०९ ए / १/१/१ & ८०९/ए/१/१/५ (पार्ट) ऑफ व्हिलेज पोईसर,
कांदीवली ( पूर्व) मुंबई - १०१
३) श्री चित्ररंजन सचिव,
विष्णू शिवम टॉवर को.ऑप.हौ.सो.लि., सीटीएस नं. ७९२/ ए,
७९२/२, ८०९ ए / १/१/१ & ८०९/ए/१/१/५ (पार्ट) ऑफ व्हिलेज पोईसर,
कांदीवली ( पूर्व) मुंबई - १०१
४) श्रीमती राखी खजिनदार ,
विष्णू शिवम टॉवर को.ऑप.हौ.सो.लि., सीटीएस नं. ७९२/ ए,
७९२/२, ८०९ ए / १/१/१ & ८०९/ए/१/१/५ (पार्ट) ऑफ व्हिलेज पोईसर,
कांदीवली ( पूर्व) मुंबई - १०१
५) समिती सदस्य
विष्णू शिवम टॉवर को.ऑप.हौ.सो.लि., सीटीएस नं. ७९२/ ए,
७९२/२, ८०९ ए / १/१/१ & ८०९/ए/१/१/५ (पार्ट) ऑफ व्हिलेज पोईसर,
कांदीवली ( पूर्व) मुंबई - १०१

२/- यांना कळविणेत येते की, संस्थेच्या सपुर्ण दप्तराचा ताबा निवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करुन तसा अहवाल सादर करावा तसेच सदर नियुक्तीच्या आदेशापासून संस्था पदाधिकारी यांच्या कोणताही आर्थिक बाबी संदर्भात बँक व्यवहार करण्यात येऊ नये. अन्यथा याबाबतची सर्वस्वी जबाबदारी सबंधितांची राहील याची कृपया गंभीर नोंद घ्यावी.

६) व्यवस्थापक,मुंबई जिल्हा गृहनिर्माण सहकारी संस्थाचा संघ,विकास प्रिमायसेस ,फोर्ट मुंबई- ०१
७) चेअरमन/व्यवस्थापक, दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा कांदीवली

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१.मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे
२.मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था मुंबई विभाग मुंबई
३.मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४) मुंबई
४.निवड नस्ती.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

Scanned by CamScanner